# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 May 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०७ मे २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये करण्यात आलेली कारवाई ही संयमी, अचूक आणि निर्णायक - कर्नल सोफिया कुरेशी यांची माहिती
- या कारवाईचं देशातल्या सवर्वपक्षीय नेत्यांकडून कौतुक, आपल्याला भारतीय लष्कराचा अभिमान असल्याची काँग्रेस नेते राहुल गांधी यांची प्रतिक्रिया
- देशातल्या पाच आयआयटीमध्ये शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या क्षमतेचा विस्तार करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता, वीज क्षेत्राला कोळसा वाटपासाठी सुधारीत शक्ती धोरणाला मंजुरी

आणि

- ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक माधव वझे यांचं निधन

****

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये करण्यात आलेली कारवाई ही संयमी, अचूक आणि निर्णायक होती, भारताच्या धोरणात्मक क्षमतेचं हे प्रतिक असल्याचं, कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितलं आहे. काल मध्यरात्री भारतीय संरक्षण दलांनी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर विषयी परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारतीय लष्कर आणि हवाई दलाने आज संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी कर्नल सोफिया कुरेशी, हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंह आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी या कारवाईमागची भुमिका सांगितली. मध्यरात्री एक वाजून पाच मिनिटं ते एक वाजून तीस मिनिटांपर्यंत ही कारवाई करण्यात आल्याचं कर्नल कुरेशी यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या –

# बाईट – कर्नल सोफिया कुरेशी

गेली ३० वर्षं पाकिस्ताननं पुरवलेल्या पायाभूत सुविधांच्या आधारे इथं दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिलं जात होतं. पाकिस्तानच्या कोणत्याही नागरी वस्तीला किंवा लष्करी आस्थापनांना धक्का न लावता ही मोहीम फत्ते झाल्याचं विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं. या कारवाईतून पाकिस्तानचे दहशतवादाशी लागेबांधे उघड झाले असल्याचं ते म्हणाले.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतानं पाकिस्तानमधल्या लष्कर ए तोयबा, जैश ए मोहम्मद, हिजबुल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांचे तळ उद्ध्वस्त केले. बहावलपूर, चक आमरू, भिंबेर, मुरीदके, मुझफ्फराबाद, कोटली, सियालकोट, गुलपूर आणि बाघ या अतिरेकी तळांवर भारतानं मध्यरात्री क्षेपणास्त्रं डागली. हल्ल्यादरम्यान भारतानं पाकिस्तानात काही ठिकाणी १०० किलोमीटर आत असलेल्या दहशतवादी तळांनाही लक्ष्य केलं. पाकिस्ताननंही या हल्ल्याला दुजोरा दिला आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेल्या कारवाईची माहिती दिली. दहशतवादाविरोधातील लढ्यात भारताने घेतलेली ही ठोस भूमिका राष्ट्रपतींना सादर करण्यात आली असून, या कारवाईमागचा राष्ट्रीय दृष्टिकोन अधोरेखित करण्यात आला.

दरम्यान, या अचूक कारवाईबद्दल पंतप्रधानांनी भारतीय सैन्यदलाची प्रशंसा केली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधानांनी सैन्याला लक्ष्यं ठरवण्याची तसंच कारवाई करण्याची संपूर्ण मोकळीक दिली होती.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल यांनी अनेक देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना या कारवाईची माहिती दिली. ही कारवाई वाढवण्याची भारताची इच्छा नाही, मात्र पाकिस्ताननं काही कारवाई करण्याचा प्रयत्न केल्यास त्याला भारत चोख उत्तर देईल, असं डोवाल यांनी म्हटलं आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या संदर्भात सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे.

****

ऑपरेशन सिंदूरनंतर अनेक देशांतर्गत विमान उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. जम्मू, श्रीनगर, लेह, जोधपूर, अमृतसर, भुज, जामनगर, चंदीगड आणि राजकोटला

जाणारी विमानं या महिन्याच्या १० तारखेपर्यंत रद्द करण्यात आल्याची माहिती एअर इंडियानं दिली आहे. इंडिगोनंही आज श्रीनगर, जम्मू, अमृतसर, लेह, चंदीगड, धर्मशाळा, बिकानेर आणि जोधपूरला जाणाऱ्या आणि येणाऱ्या विमान सेवा रद्द केल्या आहेत.

****

भारतीय संरक्षण दलानं राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'चं सर्वपक्षीय नेत्यांनी कौतुक केलं आहे.

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या निरपराध भारतीयांच्या निर्घृण हत्येला भारतानं दिलेली प्रतिक्रिया म्हणजे ऑपरेशन सिंदूर आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय लष्कराचं कौतुक केलं आहे. तर, जगानं दहशतवादाला शून्य सहिष्णुता दाखवली पाहिजे, असं मत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं.

आपल्याला भारतीय लष्कराचा अभिमान असल्याचं लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. तर, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस दहशतवादाविरोधात कोणतीही निर्णायक कारवाई करण्यासाठी लष्कर आणि सरकारच्या पाठीशी ठामपणे उभी आहे असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.

****

या कारवाईच्या नावामधूनच याबाबतचं गांभीर्य स्पष्ट होतं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं असून, लष्करानं या कारवाईचं चित्रिकरणच उपलब्ध करून दिल्यामुळे या कारवाईबाबत कोणी शंका उपस्थित करू शकणार नाही, असं म्हटलं आहे.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत बोलताना, या कारवाईमुळे पाकिस्तानला तर कडक संदेश गेलाच आहे, त्यासोबतच पहलगाम हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळाल्याचं म्हटलं आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद सहन केला जाणार नाही, हे या कारवाईनं सिद्ध झाल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी, पाकिस्तानी नागरिक किंवा लष्करी तळांना हानी न करता केवळ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केल्याबद्दल भारतीय सैन्याचं कौतुक केलं आहे. या कठीण काळात आपल्या पक्षाचा सरकारला पाठिंबा असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

छत्तीसगढच्या बीजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत बावीस नक्षलवादी ठार झाले. आज सकाळी सुरू झालेली ही कारवाई अजूनही सुरू असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

देशातल्या पाच आयआयटी म्हणजेच भारतीय तंत्रज्ञान संस्थांच्या शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या क्षमतेचा विस्तार करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. आंध्र प्रदेशात तिरुपती, छत्तीसगडमध्ये भिलाई, जम्मू काश्मीरमध्ये जम्मू, कर्नाटकमध्ये धारवाड आणि केरळमध्ये पल्लकड इथं स्थापन झालेल्या आयआयटीचा यात समावेश आहे. या प्रमुख संस्थांमध्ये साडेसहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावं यासाठी या विस्ताराला मंजुरी देण्यात आली आहे. वीज क्षेत्राला कोळसा वाटपासाठी सुधारीत शक्ती धोरणाला देखील मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. औष्णिक वीज प्रकल्पांना यामुळे नवीन कोळसा जोडणी मिळणार आहे.

दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदस्यांनी, ऑपरेशन सिंदूर राबवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आणि त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

****

गडचिरोली इथल्या गोंडवाना विद्यापीठाचे लॉइड्स मेटल्स अँड एनर्जी ही कंपनी तसंच पश्चिम ऑस्ट्रेलियातलं कर्टीन विद्यापीठ यांच्याशी आज सामंजस्य करार झाले. मुंबईत राजभवनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हे करार करण्यात आले. यातून गडचिरोली इथल्या युवकांना विविध शाखांचं अभियांत्रिकी प्रशिक्षण देण्यासाठी ‘विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था’ स्थापन करण्यात येणार असून, गोंडवाना विद्यापीठ आणि कर्टीन विद्यापीठ यांच्यात जुळी पदवी अर्थात ट्विनिंग डिग्री सुविधा सुरू होणार आहे.

****

ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक माधव वझे यांचं आज सकाळी निधन झालं, ते ८६ वर्षांचे होते. प्र. के. अत्रे दिग्दर्शित 'श्यामची आई' या चित्रपटात माधव वझे यांनी साकारलेली "श्याम"ची प्रमुख भूमिका खूप गाजली होती. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा पहिला सुवर्ण कमळ राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त झाला होता. डिअर जिंदगी, थ्री इडियट्स या हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका केल्या होत्या. त्यांच्या प्रायोगिक रंगभूमी – तीन अंक, या ग्रंथाला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला होता.

****

विना अपघात सेवा बजावणाऱ्या एसटीच्या चालकांना दरवर्षी रोख रक्कम देऊन गौरवण्यात येणार असल्याची माहिती, परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते आज एस टी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या तीनशे सातव्या बैठकीत बोलत होते. राज्यातल्या २०४ बस स्थानकावर एटीएम केंद्रं सुरू करणार असल्याची तसंच अतिशय दुर्गम भागातल्या आदिवासी पाड्यांपर्यंत बससेवा पुरवण्याकरता शंभर मिनी बसेस खरेदी करणार असल्याची माहितीही सरनाईक यांनी दिली.

****